## संक्षिप्त वृत्त



प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणपूर्ती प्रमाणपत्र देताना मान्यवर.

### अंडी दिनानिमित्त कुक्कुटपालन प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण सोहळा

**सोलापूर :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत सघन कुक्कुट विकास गट, सोलापूर येथे क्र. ३ तुकडीचे चा प्रमाणपत्र वितरण कुक्कुटपालन प्रशिक्षण समारंभ जिल्हा प्रभारी उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. व्हि. डी. येवले यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी जागतिक अंडी दिनानिमित्त प्रशिक्षणार्थींना उकडलेली अंडी वाटप करून अंड्याच्या पोषणमूल्यांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमात डॉ. स्नेहंका बोधनकर, गट-अचे पशुधन विकास अधिकारी यांनी अंड्याच्या दैनंदिन आहारातील महत्त्वावर शालेय विद्यार्थी व नागरीकांनी अंड्याचा आहारात समावेश करून आरोग्यरक्षण करावे, असे म्हणत पुढील प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील पशुपालक व सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी नोंदणी करून लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमासाठी जमादार, संताजी देशमुख, प्रशांत निकंबे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस. पी. माने यांनी केले.




विजयी खेळाडूंसमवेत प्रा.डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, डॉ.आनंद चव्हाण, प्रा. संतोष खेंडे व इतर.

### संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे विभागीय स्पर्धेत यश


**सोलापूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत पुणे क्रीडा कार्यालय आयोजित शालेय पूणे विभागीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी यश प्राप्त केले आहे. यामध्ये तनिष्का पवार या खेळाडूने ५९ ते ६३ किलो वजनगटामध्ये सुवर्णपदक पटकावले आहे. सुजल परदेशी याने ५१-५४ किलो वजनगटामध्ये कांस्यपदक, अनुष्का जगताप ४५-४८ किलो वजनगटामध्ये कांस्यपदक पटकावले. यावेळी तनिष्का पवार राज्य स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने कौतुक करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### रतन शिंदे यांचे निधन



**नाझरे :** बलवडी (ता. सांगोला) येथील श्रीमती रतन श्रीरंग शिंदे यांचे रविवार दिनांक १२ ऑक्टोंबर २०२५ रोजी सायंकाळी दहा वाजता निधन झाले. मृत्युप्रसंगी त्यांचे वय ६८ होते. मा. सरपंच प्रसाद शिंदे यांच्या त्या चुलती होत्या तर आरोग्यनिरीक्षक प्रशांत व महेश यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असं मोठा परिवार आहे. त्यांचा तिसरा दिवसाचा विधी कार्यक्रम बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसात वाजता बलवडी येथे होईल असे नातेवाईकांनी सांगितले.

# शहराचा पाणीपुरवठा पुन्हा रोटेशनसाठी एक दिवसाने पुढे



**सोलापूर :** शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उपसा करण्यात येणाऱ्या दोन ठिकाणी वीज पुरवठा तब्बल ८ ते ९ तास खंडित राहिल्याने पाणीपुरवठा उपसा प्रक्रिया बंद होती परिणामी शहराचा पाणीपुरवठा पुन्हा एकदा एक रोटेशनसाठी एक दिवसाने पुढे जाणार आहे आणि यामुळेच संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा पुढील आठवडाभरासाठी विस्कळीत होणार आहे.

शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्रास महाराष्ट्र राज्य महावितरण मंडळाकडून होणारा विद्युत पुरवठा सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी पहाटे ५: ३० ते दुपारी १: १५ पर्यंत खंडीत झाला होता तर पाकणी जलशुध्दीकरण केंद्रास होणारा विद्युत पुरवठा सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२: १० ते रात्री ९: ३० वाजेपर्यंत खंडीत झाला होता. यामुळे सोलापूर शहर पाणी पुरवठयासाठी टाकळी पंप हाऊसवरुन सुमारे ८ तास व उजनी पंप हाऊसवरुन सुमारे ९ तास पाण्याचा उपसा होवू शकला नाही. या कारणामुळे दि. १३ ऑक्टोबर रोजीचा नियोजित पाणीपुरवठा होवू शकलेला नाही. दोन्ही कारणामुळे संपूर्ण शहराचा दि. १४ ऑक्टोबर पासूनचा नियोजित पाणी पुरवठा एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे. शहरातील नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

#### नागरिकांची त्रेधातिरपट उडणार

सोलापूर- उजनी दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होऊन शहराला आता अधिक पाणी मिळत असल्याने महापालिका प्रशासनाकडून शहरातील काही भागांमध्ये तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात आला होता. तर शहरातील आणखी काही भागांसह हद्दवाढ भागांमधील पाणीपुरवठा हा पाच दिवसाआडच ठेवण्यात आला आहे. यामुळे शहरातील त्या तीन दिवसाआड पाणीपुरवठा होणाऱ्या भागांना फारसा फरक पडणार नाही पण हद्दवाढ भागाला मात्र आता आठवड्यानंतर पाणी पुरवठा होणार असल्याने या भागातील नागरिकांची त्रेधातिरपट उडणार आहे.



## बार्शी पंचायत समितीचे आरक्षण जाहीर

### सर्वसाधारण महिलांसाठी ३ जागा आरक्षित

**बार्शी :** पंचायत समिती सदस्यपदाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी तालुक्यातील १२ गणांची आरक्षण सोडत सोमवारी काढण्यात आली. गतवेळचा विचार केला तर यावेळी काही गणात पूर्वीचेच आरक्षण पडल्याचे दिसत आहे. सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात आरक्षण सोडतीस सुरूवात झाली. सुरूवातीला अनुसूचित जाती, अनु.जाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, त्यानंतर सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण काढण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार शिल्पा ओसवाल, बार्शीचे तहसीलदार एफ. आर. शेख, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, महसूल नायब तहसीलदार रवींद्र सानप, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंडे, सहायक गटविकास अधिकारी दिपक साळुंके, राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. १२ पैकी अनु. जाती प्रवर्गासाठी एक, अनु. जाती महिलेसाठी एक, नामाप्र एक, नामाप्र महिला २, सर्वसाधारण ४, सर्वसाधारण महिलांसाठी ३ जागा आरक्षित झाल्या.

#### जाहीर झालेले आरक्षण पुढील प्रमाणे

सर्वसाधारण महिला : उपळाई ठो, मालवंडी, मानेगाव, सर्वसाधारण : गौडगाव, बावी, पानगाव, सासुरे, नामाप्र महिला : आगळगाव, उपळे दु, नामाप्र : कारी, अनुसूचित जाती महिला : शेळगाव आर, अनु जाती : पांगरी.

## एसटीची सेवा सुरळीत

**सोलापूर :** दिवाळी सणाच्या अगोदर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कामगार संघटनेकडून सोमवार, १३ ऑक्टोंबरला एस टी महामंडळ कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्य व्यापी आंदोलन पुकारण्यात आले होते. मात्र सोलापूर विभागाकडून कसल्याही प्रकारचे आंदोलन सुरू नसल्याचे दिसून आले नाही. यावेळी विविध जिल्हा आणि तालुक्यातील प्रवाशांसाठी एसटी महामंडळाची सेवा सुरू असल्याचे पाहायला मिळाले.

शहरातील अगारातून एस.टी. वाहतूक सेवा जैसे थे परास्थित असून नियमित वाहतूक सेवा चालू असल्याचे दिसून आले. आंदोलन विषयी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागाकडून बैठक घेण्यात आली होती. यावेळी बैठकीला तीन वाजता सुरुवात झाली. ही बैठक उशिरा पर्यंत चालू होती, मात्र आंदोलन विषयी कोणता निर्णय झाला, हे अद्याप समजले नाही.

मात्र आज आंदोलन विषयी माहिती मिळण्याची शक्यता आहे. दिवाळी सण जवळ आला असून यामुळे शहरातील



### सोलापूर विभागाकडून कसल्याही प्रकारचे आंदोलन नाही

आंदोलनाचा निर्णय काय होणार याचाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बैठकीत काय निर्णय झाला याचा सोलापूर विभागाकडे आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे आंदोलनाची स्थिती काय असणार ही बाब अद्याप गुलदस्त्यातच आहे. अद्याप तरी एस टी वाहतूक सेवा चालू आहे, मात्र दिवाळीच्या सणातच प्रवाशांसाठी आंदोलनामुळे एस टी वाहतूक बंद राहते का असा मोठा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट

### वेतनवाढीच्या फरकाचा हप्ता आता वेतनासोबत देणार

**मुंबई :** एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा तसेच वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे जाहीर केला.

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या बैठकिस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, एस. टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने सुमारे ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच सन २०२०-२४ दरम्यानच्या वेतन वाढतील फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतना सोबत देण्यात येणार असून, यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत.



त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, श्री.सरनाईक यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून, शासनाने आज हा निर्णय घेतला आहे.

## राष्ट्रीय जनगणनेत लिंगायत धर्मासाठी स्वतंत्र कॉलम ठेवावा : अविनाश भोसीकर

**सोलापूर / प्रतिनिधी**

येणाऱ्या राष्ट्रीय जनगणनेत लिंगायत धर्मासाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात यावा. लिंगायत धर्माची नोंद धर्म संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि भावी पिढ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्व लिंगायत समाज बांधवांनी आपले मतभेद, हेवेदावे बाजूला ठेवून सर्वांनी जनगणनेमध्ये धर्माच्या कॉलम मध्ये लिंगायत अशी नोंद करावी, अशी मागणी बसव ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश भोसीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लिंगायत धर्माची संविधानिक नोंद करुन राष्ट्रीय पातळीवर धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा जाहीर करावा. सरकारच्या धोरणानुसार आरक्षण हे धर्माला नसून जात समूहाला असते. त्यामुळे ज्यांच्या शैक्षणिक नोंदींमध्ये जातीच्या कॉलममध्ये लिंगायत/हिंदू लिंगायत असे लिहिले आहे, त्यांच्या नोंदींमध्ये त्यांच्या मूळ जातींचे (उदा. वाणी, तेली, माळी इ.) स्पष्ट उल्लेख होण्यासाठी सरकारने शुद्धिपत्रक काढून दुरुस्ती करावी व त्या सर्वांना ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करावे.

महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळासाठी १ हजार कोटींची तरतूद करून केवळ ओबीसी लाभार्थी ही अट रद्द करून सर्व लिंगायत पोटजातींना लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट करावे. मंगळवेढा येथे किमान १०० एकर जागेवर महात्मा बसवेश्वर राष्ट्रीय स्मारक त्वरित उभारावे. म्हैसूर, हैदराबाद, तामीळनाडू, मुंबई गॅझेटमध्ये लिंगायत अशी नोंद आहे.

ब्रिटिश सरकारच्या कालावधीत झालेल्या जनगणनेवेळीही लिंगायत अशी नोंद घेतली गेली आहे, असे बसव ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश भोसीकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस बसव ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष वायचळ, सोलापूर जिल्हाध्यक्ष अमित रोडगे, सामाजिक कार्याध्यक्ष बसवराज चाकाई, कार्यकर्ते विरेंद्र हिंगमिरे, लातूर जिल्हाध्यक्ष किशोर पाटील, कार्याध्यक्ष बसवेश्वर हेंगणे, धाराशिव जिल्हाध्यक्ष परमेश्वर पाटील, रवी कोरे, भीमाशंकर सिंदगी आदी उपस्थित होते.




### मंगळवेढा पंचायत समितीचे आरक्षण जाहीर

**मंगळवेढा :** मंगळवेढा तहसील कार्यालयातील आवारात दुपारी भुसंपादन अधिकारी अमोलसिंह भोसले यांच्या उपस्थितीत तहसीलदार मदन जाधव, नायब तहसीलदार जयश्री स्वामी यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थिती पंचायत समिती गणाचे आरक्षण सोडत काढण्यात आले. श्री संत दामाजी नगर गण- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, बोराळे गण-. सर्वसाधारण महिला, हुलजंती गण - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, मरवडे गण. - सर्वसाधारण महिला, चोखामेळा नगर गण -सर्वसाधारण महिला, लक्ष्मी दहिवडी. गण -सर्वसाधारण, भोसे गण. सर्वसाधारण, रड्डे गण. - अनुसूचित जाती. अशाप्रकारे पंचायत समिती गणाची सोडत जाहीर करण्यात आली आहे. सभापतीपद हे सर्वसाधारण महिला करिता जाहीर झाले आहे. यावेळी ग्रामीण भागातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी रॅगिंग करू नका कठोर शिक्षा होईल : गाजरे

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात अँटी रॅगिंग कार्यशाळा

**अक्कलकोट / प्रतिनिधी**

शाळा महाविद्यालय तसेच वसतिगृहातून विद्यार्थ्यांवर सीनियर विद्यार्थ्यांकडून रॅगिंग चे प्रकार होतात. रॅगिंग ही अमानुष पद्धत आहे. बंधू भावाने वागणे हा आपला मानवी स्वभाव असतो. परंतु रॅगिंग केल्यामुळे आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी होते, असा सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांचा गैरसमज झाला आहे. रॅगिंग केल्याचे निदर्शनास आल्यास कठोर शिक्षा सुनावली जाते, म्हणून विद्यार्थ्यांनी रॅगिंग पासून दूर राहावे, असे प्रतिपादन निर्भय पोलीस ज्योती गाजरे यांनी व्यक्त केले.



कल्याणशेट्टी महाविद्यालयात अँटी रॅगिंग कार्यशाळेप्रसंगी ज्योती गाजरे, मनिषा शिंदे व मान्यवर.

#### पोलिसांची निष्कारण त्यांची बदनामी करू नका..

विद्यार्थी स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी रॅगिंगच्या आहारी जातात. ग्रुपमध्ये स्वतःचे वर्चस्व सिद्ध करतात. शेवटी त्यांना पोलिसांच्या कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागते, कठोर शिक्षा झाल्यानंतर विनाकारण पोलिसांना दोष दिला जातो बदनामी केली जाते परंतु पोलीस आपले मित्र असतात हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे असे मनीषा शिंदे यांनी कार्यशाळेस उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना सांगितले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अँटी रॅंकिंग कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी निर्भय पथकातील मनीषा चिंचोळे, नीता बिराजदार उपस्थित होत्या. व्यासपीठावर महिला विकास कक्षेच्या डॉ शितल झिंगाडे-भरमे, प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार उपस्थित होत्या.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नीता बिराजदार म्हणाल्या की, विद्यार्थिनीची छेडछाड होत असेल तर निर्भया पथक सदैव मदतीसाठी तत्पर असते.

विद्यार्थ्यांनी सुद्धा नीतिमत्तेने वागावे मोबाईल चा वापर अभ्यासासाठी करावा, त्यातून नवीन ज्ञान घ्यावे वाईट गोष्टी सोडून द्याव्यात रॅगिंग पासून दूर राहावे. प्रास्ताविक प्रा शितल फुटाणे यांनी केले सूत्रसंचलन डॉ शितल झिंगाडे-भरमे यांनी केले.

आभार प्रा प्राची गणाचारी यांनी मानले. कार्यशाळेस उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

## माळशिरस पंचायत समितीचे आरक्षण सोडत जाहीर

### महिलांनाही ५० टक्के जागांवर संधी!

**वेळापूर :** माळशिरस पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत आज माळशिरस पंचायत समिती येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा सभागृह माळशिरस येथे काढण्यात आली. प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आलेल्या आरक्षण सोडते बद्दल सर्व माहिती माळशिरस तालुक्याचे तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी दिली.

माळशिरस तालुक्यात पंचायत समितीच्या १८ जागा असून त्यासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. लोकसंख्येनुसार अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव गण आणि सर्व साधारण गण यांची घोषणा या सोडतीत करण्यात आली. २०११ च्या गणान जनगणनेनुसार अनुसूचित जमाती लोकसंख्या लक्षात घेऊन माळशिरस पंचायत समितीमध्ये तीन गण हे अनुसूचित जमाती आरक्षित ठेवण्यात आले तर नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी चार जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत ,तर सर्वसाधारण साठी अकरा जागा आरक्षित करण्यात आल्या. महिलांचे ५० टक्के आरक्षण सोडत काढण्यात आली. माळशिरस पंचायत समितीम मधील १८ गणापैकी बोरगाव, माळीनगर, दहिगाव हे तीन गण अनुसूचित जमातीसाठी राखीव झाले असून त्यातील बोरगाव व दहिगाव हे महिला राखीव झाले आहेत .तर नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी तांदुळवाडी, जांबूड, भांबुर्डी, संग्रामनगर हे चार गण आरक्षित झाले असून त्यातील तांदूळवाडी व संग्राम नगर हे दोन गन नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव म्हणून आरक्षित झाले आहेत. तालुक्यातील एकूण १८ गणापैकी गुरसाळे, मांडवे, कन्हेर, फोंडशिरस, मेडद, लवंग, वेळापूर, यशवंतनगर, निमगाव, गोरडवाडी, पिलीव हे ११ गण सर्वसाधारण झाले आहेत. त्यातील मांडवे, फोंडशिरस, लवंग, गोरडवाडी, पिलीव हे पाच गण महिला सर्वसाधारण झाले आहेत. महिला राखीव ठेवण्यासाठी चिठ्ठ्या काढण्यात आल्या होत्या. या आरक्षण सोडत साठी प्रांत अधिकारी विजया पांगारकर यांना तहसीलदार सुरेश शेजुळ व निवासी नायब तहसीलदार अमोल कदम यांनी सहकार्य केले.

#### माळशिरस पंचायत समिती आरक्षण २०२५

एकूण १८ गण अनुसूचित जाती राखीव तीन-बोरगाव (स्त्री राखीव), माळीनगर दहिगाव( स्त्री राखीव). नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी चार- तांदूळवाडी( स्त्री राखीव), जांभूड, भांबुर्डी, संग्राम नगर (स्त्री राखीव सर्वसाधारण जागा अकराः गुरसाळे, मांडवे (स्त्री राखीव), कन्हेर, फोंडशिरस( स्त्री राखीव), मेडद, लवंग( स्त्री राखीव), वेळापूर, यशवंत नगर, निमगाव, गोरडवाडी (स्त्री राखीव), पिलीव (स्त्री राखीव).